# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date: 23 August 2024

Time: 7.10 to 7.20 AM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक: २३ ऑगस्ट २०२४ सकाळी ७.१० मि.**

********

***ठळक बातम्या***

- **देशभरात आज साजरा होणार पहिला राष्ट्रीय अंतराळ दिवस, नवी दिल्लीत राष्ट्रपतींच्या उपस्थितीत मुख्य कार्यक्रम**
- **निवासी डॉक्टरांच्या सुरक्षेबाबत मुख्यमंत्र्यांच्या आश्वासनानंतर मार्ड संघटनेकडून संप मागे घेण्याचा निर्णय**
- **बदलापूर लैंगिक अत्याचार प्रकरणी दिरंगाईबद्दल मुंबई उच्च न्यायालयाचे पोलिस प्रशासनावर ताशेरे, संबंधित शाळेवर कारवाई करणार असल्याची सरकारची माहिती**
- **शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी नवीन उपाययोजना लागू करण्यासंबंधी शासन निर्णय जारी**

**आणि**

- **राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा लांबणीवर टाकण्याचा महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचा निर्णय**

***सविस्तर बातम्या***

पहिला राष्ट्रीय अंतराळ दिवस आज साजरा केला जाणार आहे. यानिमित्त नवी दिल्लीत भारत मंडपम इथं होणाऱ्या विशेष कार्यक्रमाचं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते उद्घाटन होणार आहे. यासोबतच देशभरात एक हजाराहून अधिक कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. गेल्या वर्षी २३ ऑगस्टला चंद्रयान तीन मिशन

अंतर्गत विक्रम लँडर चंद्राच्या पृष्ठभागावर सुरक्षितरित्या उतरलं, या यशाच्या स्मरणार्थ हा दिवस अंतराळ दिन म्हणून साजरा करण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला आहे.

****

राष्ट्रीय विज्ञान पुरस्कार काल राष्ट्रपतींच्या हस्ते प्रदान करण्यात आले. प्रख्यात बायोकेमिस्ट डॉ गोविंदराजन पद्मनाभन यांना पहिला विज्ञान रत्न पुरस्कार, तर अंतराळ विज्ञान क्षेत्रात काम करणाऱ्या चांद्रयान तीन च्या चमुला, विज्ञान टीम पुरस्कार प्रदान करण्यात आला. पुण्यातल्या इंडियन इन्स्टिटयूट ऑफ सायन्स एज्युकेशन अँड रिसर्चचे प्राचार्य जयंत उदगावकर यांना जीवशास्त्रासाठी, तर मुंबई इथल्या भाभा अणुसंशोधन केंद्राचे डॉ. आवेश कुमार त्यागी यांना अणुऊर्जा क्षेत्रातल्या योगदानासाठी विज्ञान श्री पुरस्कार प्रदान करण्यात आला. अकोल्यातले प्रसिद्ध शास्त्रज्ञ डॉ. प्रशांत मंगले यांना संशोधन क्षेत्रातल्या योगदानासाठी, तर यवतमाळचे डॉ. यशवंत गोटे यांना कृषि विज्ञान क्षेत्रातल्या विशेष योगदानासाठी, राष्ट्रीय विज्ञान पुरस्कार प्रदान करण्यात आला.

****

कोलकाता इथं महिला डॉक्टरवर लैंगिक अत्याचार आणि हत्या प्रकरणाची काल सर्वोच्च न्यायालयात सुनावणी झाली. केंद्रीय अन्वेषण विभाग – सीबीआयनं या प्रकरणी आतापर्यंत केलेल्या तपासाची माहिती न्यायालयासमोर सादर केली. या प्रकरणाची पुढची सुनावणी पाच सप्टेंबरला होणार आहे.

दरम्यान, या घटनेच्या निषेधार्थ संपावर गेलेल्या डॉक्टरांना परत कामावर रुजू होण्याचं आवाहन न्यायालयानं केलं होतं, त्यानुसार दिल्लीतल्या अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्थान – एम्स तसंच राम मनोहर लोहिया रुग्णालयातल्या निवासी डॉक्टरांनी आपला संप मागे घेतला आहे.

****

निवासी डॉक्टरांच्या विविध मागण्यांबाबत मार्ड, तसंच मुंबई महापालिकेच्या वैद्यकीय महाविद्यालयातली संघटना बीएमसी मार्ड यांनी काल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासोबत झालेल्या बैठकीनंतर आपला संप मागे घेतला. राज्यातल्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालय – रुग्णालयातल्या निवासी डॉक्टरांच्या सुरक्षेचा सर्वंकष आढावा घेण्यासाठी पोलीस अधिकाऱ्यांची नियुक्त करावी, निवासी डॉक्टरांना निवास व्यवस्था, वसतिगृह यासह विद्यावेतन नियमितपणे मिळेल, असं नियोजन करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले.

****

ठाणे जिल्ह्यात बदलापूर इथं दोन विद्यार्थिनींच्या लैंगिक अत्याचार प्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल करण्यास दिरंगाई केल्याबद्दल, मुंबई उच्च न्यायालयाने पोलिस प्रशासनावर ताशेरे ओढले आहेत. काल न्यायालयात या प्रकरणी सुनावणी झाली. हा गुन्हा लपवल्याप्रकरणी संबंधित शाळेवर कारवाई करणार असल्याची माहिती, राज्य सरकारतर्फे उच्च न्यायालयात देण्यात आली. राज्य सरकारला याबाबत सविस्तर प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे निर्देश न्यायालयानं दिले असून, या प्रकरणाची पुढील सुनावणी २७ ऑगस्टला होणार आहे.

****

दरम्यान, या प्रकरणी महाविकास आघाडीनं उद्या २४ ऑगस्टला महाराष्ट्र बंदची हाक दिली आहे. या बंदमागे कोणतंही राजकारण नसून, महिला भगिनी सुरक्षित राहाव्यात यासाठी या बंदचं आवाहन केलं आहे, असं माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी म्हटलं आहे.

दरम्यान, राज्यात कुठलीही दुर्घटना होवू नये म्हणून सरकारने काळजी घ्यायला हवी, मात्र सरकारच या विषयाचं राजकारण करत असल्याचा आरोप, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केला आहे. ते काल नंदुरबार इथं बोलत होते.

****

शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षा उपाययोजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी काही नवीन उपाययोजना लागू करण्याबाबतचा शासन निर्णय शिक्षण विभागाने जारी केला आहे. शाळा आणि परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे बसवणं, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीच्या अनुषंगाने काळजी घेणं, सखी सावित्री समिती, यासंदर्भातले निर्देश या निर्णयात देण्यात आले आहेत. शाळेमध्ये विद्यार्थ्यांसोबत अनुचित प्रकार घडल्याचं उघड झाल्यानंतर शाळा व्यवस्थापनाने २४ तासाच्या आत शिक्षणाधिकाऱ्यांना माहिती द्यावी, अन्यथा संबंधित व्यक्ती अथवा संस्थेवर कारवाई करण्यात येईल, असं या शासन निर्णयात म्हटलं आहे.

****

**या बातम्या आकाशवाणीच्या छत्रपती संभाजीनगर केंद्रावरुन देत आहोत.**

****

परवा रविवारी २५ ऑगस्टला होणारी, महाराष्ट्र राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा, पुढे ढकलण्यात आली आहे. काल महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची बैठक झाली, त्यात हा निर्णय घेण्यात आला. या परीक्षेची पुढील तारीख लवकरच जाहीर

करण्यात येणार असल्याचं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे. २५ ऑगस्टला या दिवशीच आयबीपीएस, क्लर्क भरती परिक्षा असल्यानं सदर पूर्व परिक्षा पुढे ढकलण्यात आली आहे.

****

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा वचनपूर्ती मेळावा आणि लाभार्थी सन्मान सोहळा काल कोल्हापूर इथं पार पडला. यावेळी मुख्यमंत्र्यांसह उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, खासदार धैर्यशील माने तसंच मंत्रिमंडळातले अन्य सदस्य उपस्थित होते.

****

ब्राह्मण समाजासाठी परशुराम आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्यात यावं, या प्रमुख मागणीसाठी जालना इथल्या गांधीचमन चौकात आमरण उपोषणाला बसलेले दीपक रणनवरे यांनी काल आठव्या दिवशी आपलं उपोषण स्थगित केलं. समाजाच्या मुख्य मागणीवर चर्चा करण्यासाठी येत्या तीन सप्टेंबर रोजी मुंबईत मंत्रिमंडळाची बैठक आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली.

****

धाराशिव जिल्ह्यात मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेअंतर्गत तीन हजार २१४ प्रशिक्षणार्थी आस्थापनांनर रुजू झाले आहेत. जिल्ह्यात शिकाऊ प्रशिक्षणार्थी उमेदवारासाठी शासकीय कार्यालयाच्या आस्थापनेवरील पाच हजार ५६४ आणि खाजगी आस्थापनेवरील ४५७ अशी एकूण सहा हजार २२ पदे उपलब्ध करून दिली आहे.

****

अंबाजोगाई इथले डॉक्टर अरविंद देशपांडे यांचं काल निधन झालं, ते ८३ वर्षांचे होते. राज्य शासनाच्या आरोग्य सेवेतून निवृत्त झालेले डॉ देशपांडे यांनी जिल्हा क्षयरोग नियंत्रण संस्थेसाठी मोठं योगदान दिलं होतं. त्यांच्या पार्थिव देहावर आज अंबाजोगाई इथं अंत्यसंस्कार होणार आहेत.

****

जालना जिल्ह्यात काल दोन वेगवेगळ्या अपघातात तीन जणांचा मृत्यू झाला. पांगरी शिवारात समृद्धी महामार्गावर काल पहाटे भरधाव पिकअप वाहन समोरच्या वाहनाला धडकून झालेल्या अपघातात पीकअप वाहन चालकाचा जागीच मृत्यू

झाला. तर भोकरदन–आन्वा रोडवरील वाडी शिवारात काल सकाळी झालेल्या अन्य एका अपघातात दोघांचा मृत्यू झाला, तर एका जखमीला उपचारासाठी छत्रपती संभाजीनगर इथं हलवण्यात आल्याचं पोलीस सूत्रांनी सांगितलं.

****

लातूरच्या शिक्षणाधिकारी कार्यालयांतर्गत असलेल्या विद्यार्थी लाभाच्या सर्व योजना पात्र लाभार्थ्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचवाव्यात, असं आवाहन शिक्षणाधिकारी तृप्ती अंधारे यांनी केलं आहे. यासंदर्भातल्या आढावा बैठकीत त्या काल बोलत होत्या. या बैठकीमध्ये उल्हास नवभारत साक्षरता कार्यक्रमाचा प्रसार आणि प्रचार करणं, शिष्यवृत्ती योजना, राजीव गांधी विद्यार्थी अपघात सानुग्रह अनुदान योजना, छत्रपती राजाराम महाराज सारथी शिष्यवृत्ती योजना यासारख्या विद्यार्थी लाभाच्या विविध योजनांचा तालुका स्तरावर सुरू असलेल्या कामाचा आढावा घेण्यात आला.

****

अनेक देशामध्ये 'मंकी पॉक्स' या विषाणूजन्य आजाराचा संसर्ग वाढत आहे. हे लक्षात घेऊन छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील आरोग्य विभागाच्या वतीने प्रतिबंध सर्वेक्षण मोहिम हाती घेण्यात आली आहे. या मोहिमेदरम्यान या आजाराची लक्षणं आणि प्रतिबंध याबाबत जनजागृती करण्यात येत असल्याचं, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉक्टर अभय धानोरकर यांनी सांगितलं.

****

महिला अत्याचारांविरोधात, बीड इथं काल विविध संघटनांच्या वतीनं तीव्र निदर्शनं करण्यात आली. जिल्हाधिकारी कार्यालयासमोर करण्यात आलेल्या या निदर्शनात, स्टुडंट्स फेडरेशन ऑफ इंडिया – एसएफआय, डेमोक्रॅटिक युथ फेडरेशन ऑफ इंडिया डीवायएफआय आणि समविचारी पक्ष संघटनांनी सहभाग घेतला होता.

****

नांदेड जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या पीक विमा भरपाई न मिळाल्यासंदर्भातील तक्रारींच्या अनुषंगाने माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी काल जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांची भेट घेतली. राऊत यांनी येत्या ३ सप्टेंबरपर्यंत शेतकऱ्यांना तालुका कृषी अधिकाऱ्यांकडे आपल्या तक्रारी नोंदवाव्यात, असं आवाहन केलं आहे.

****